नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांकः-१८/८/२०२०

**-:परिपत्र:-**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र. १ (के) अन्वये मंगळवार, दि.१८/८/२०२० रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता भरलेल्या माहे ऑगस्ट २०२० या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

विषय क्र.१/८९

संदर्भ - १) क्रेडाई पुणे मेट्रो यांचे पत्र क्र. CREDAI-PM/18-19/162/१८-१९/१६२ दि.८/६/२०१८
२) बृहन्मुंबई महानगरपालिका परिपत्रक क्र. CHE/DP/14770/GEN दि.१७/९/२०१९
३)मा.अवरसचिव महाराष्ट्र शासन यांचे बृहन्मुंबई महानगरपालिकेकरीता जा.क्र.टिपीबी-४३१९/प्र.क्र. १५६/२०१९/नवि-११ दि.१९/९/२०१९.
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/१३५ दि. १६/६/२०२० चे पत्र.
५) मा.सौ.मानसी देशपांडे व मा.दिपक पोटे यांची दि.११/८/२०२० ची उपसूचना
६) मा.महेंद्र पठारे व मा.अशोक कांबळे यांची दि.११/८/२०२० ची उपसूचना
७) मा.स्थायी समिती ठराव क्र.३७२,दि.११/८/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

विविध प्रकारच्या बांधकाम परवानगी अंतर्गत आकारण्यात येणारे विविध प्रिमियम/शुल्क टप्पेनिहाय भरणेची सवलत देणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे महानगरपालिका अधिनियम मनपा/लोकसेवा/मआ/४५९/२०१५ दि.१५/७/२०१५ अन्वये येणारे प्रिमियम शुल्क र.रु. ५० लाखापेक्षा जास्त असल्यास अशा सर्व प्रस्तावांना प्रिमियम (Fire Premium)सह ४०%, ३०% व ३०% असा भरणा १ ल्या, १२ व्या व २४ व्या महिन्यांत भरणेची सवलत देणेस

२) विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली २०१७ मधील कलम १७.१, १७.३, १७.४, २४.१ व २४.१० अन्वये महानगरपालिकेकडे देय निवासी, व्यापारी, औद्योगिक व आय.टी.क्षेत्राच्या प्रिमियम एफ.एस.आय. (F.S.I.) पोटी जमा होणाऱ्या मनपाच्या हिस्स्याचे देय प्रिमियम शुल्क टप्पेनिहाय ८.५०% व्याजासह भरणेस विकसकांना वरीलप्रमाणे सवलत देणेस

३) विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली २०१७ मधील कलम १.४ नुसार डी.सी.पी.आर. २०१७ व डीसीआर वापरण्याच्या विकल्पास २०१७ मधील कलम १७.७, १८.२६ व विकास नियंत्रण नियमावली मधील कलम १५.४.२ अन्वये बाल्कनी, जीना, पॅसेज, डबल हाईट टेरेस इत्यादी मधील देय प्रिमियम शुल्क टप्पेनिहाय ८.५०% व्याजासह भरणेस विकसकांना वरीलप्रमाणे सवलत देणेस

४) दुसरा तीसरा किंवा चौथा हप्ता भरण्यास विलंब झाल्यास १८% प्रतिवर्षे इतक्या दंडाची आकारणी करण्यास

५) शेवटचा हप्ता भरेपर्यंत एकुण बांधीव क्षेत्राच्या १०% अथवा सर्वात वरील एका मजल्याचा (यापैकी जास्तीत जास्त) पूर्णत्वाचा दाखला राखून ठेवण्यास

६) याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस

७) वरील प्रस्ताव मे.शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस

८) विकसकांनी पूर्ण रक्कम एक रकमी भरणार असेल तर त्यांना १०% सवलत देणेस,

**विषय क्र.२/९०**

संदर्भ - १)मा.धीरज घाटे,सभागृह नेते,मा.सौ.दिपाली धुमाळ,विरोधी पक्षनेत्या,मा.अविनाश बागवे,मा.अदित्य माळवे यांचे दि.११/६/२०२० चे पत्र.
२) मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.५, दि.१२/६/२०२०
३) मा.दिपक पोटे व मा.सुनिल कांबळे, आमदार यांची दि.११/८/२०२० ची उपसूचना
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.३७७,दि.११/८/२०२०

----

मा.महिला व बाल कल्याण समितीची शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे महानगरपालिकेच्या मा.सभासदांना पुणे महानगरपालिकेच्या वतीने अशंदायी सहाय्य आरोग्य योजना

लागू आहे.सदर योजनाच्या अंतर्गत यापूर्वी शिक्षण मंडळ सदस्य यांना देखील सदर आरोग्य योजना लागू आहे. तसेच पुणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या मा.सदस्यांनाही सदर योजना लागू होती. तरी पुणे महानगरपालिकेच्या मा.सभासदांप्रमाणे अंशदायी सहाय्य आरोग्य योजना ही पुणे महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण समितीच्या अशासकीय सभासद यांना याच धर्तीवरती लागू करण्यास तसेच पुणे महानगरपालिकेच्या माजी सभासदांना ज्याप्रमाणे अंशदायी सहाय्य योजना लागू आहे त्याचप्रमाणे सदर योजना पुणे महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण समितीच्या अशासकीय माजी सभासद यांना लागू करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.३/९१**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/२०२ दि.४/८/२०२० चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४०२,दि.११/८/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतीबंधात्मक उपाययोजने अंतर्गत उद्‌भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीमध्ये पुणे मनपा सणस ग्राउंड बॉईज हॉस्टेल येथे लागण झालेल्या रुग्णांना व संशयीत रुग्णांना पुरविण्यात आलेल्या नाष्टा व दोन वेळा जेवण पुरविणे या कामी मे.द अक्षय पात्रा फाउंडेशन यांना र.रुपये ४,७०,१००/– पर्यंत जेवण पुरविणे या कामाचे देयक अदा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

**विषय क्र.४/९२**

संदर्भ – १) मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे ठराव क्र. ८/१०३४ दि.२६/३/२०२०

२) मा.महापालिका आयुक्त यांचे ठराव क्र. ६/१८ दि.१३/४/२०२०

३) खात्याचे निवेदन जा.क्र. उप१/६८१ दि.१५/५/२०२०

४) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.

५) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.

६) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

७) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)

८) खात्याचे निवेदन जा.क्र. उपआयुक्त१/६८१ दि.१५/५/२०२०

९) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/२०३ दि.४/८/२०२० चे पत्र.

१०) मा.स्थायी समिती ठराव क्र.४०३,दि.११/८/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिका झोन क्र. १ अंतर्गत ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत स्थापित केलेल्या आयसोलेशन/CCC केंद्रामध्ये दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दररोज सकाळी चहा, नाष्टा, दुपारचे व संध्याकाळचे जेवण पुरविणे इ. कामे करणे कामी जाहिर निविदा न मागविता मे.अरहन्ती २४ एंटरप्रायझेस या एजन्सीकडून दि.८/५/२०२० पासून काम करुन घेणेस व सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये खालील बाबी मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

१) ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत विविध ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमुद केलेल्या आयसोलेशन सेंटरमध्ये दैनंदिन दाखल होणाऱ्या नागरिकांना तसेच अवेटेड,निगेटिव्ह, पॉझिटिव्ह पेशंट व कोरन्टाईन साठी दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन सकाळी चहा, नाष्टा, दुपारचा चहा याची प्रती प्लेटची र.रु. ६०/– मे.अरहन्ती २४ एंटरप्रायझेस, स.नं. १६४/१बी, फ्लॅट नं. २०१, लिली अपार्टमेंट, लेन नं. १० आदर्श कॉलनी विद्यानगर, टिंगरेनगर, पुणे यांना र.रु. ६०/– प्रतिदिन प्रती व्यक्ती (जीएसटी अन्य करांसहीत) यांनुसार देणेस तसेच झालेल्या कामाचे दि.८/५/२०२० पासून दि.२/६/२०२० अखेर पर्यंतचे दिलेले बिल मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेले असून ते बरोबर आहे तरी सदर बिलामध्ये नमुद केलेली र.रु. ८,१९,८४०/– मे.अरहन्ती २४ एंटरप्रायझेस यांच्या नावे धनादेशाद्वारे खालील अर्थशिर्षकांमधून अदा करणेस

अर्थशिर्षक महसुली कामांसाठी – कोविड १९ अंतर्गत अत्यावश्यक महसुली कामाच्या खर्चासाठी मदत बजेट कोड RE17F 257

भांडवली कामांसाठी – कोविड १९ अंतर्गत अत्यावश्यक भांडवली कामाच्या खर्चासाठी मदत बजेट कोड CE17A242/j6-30

२) वरील अ.क्र. १ चे अंमलबजावणी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) नुसार दि.८/५/२०२० पासून ते दि.२/६/२०२० अखेर पर्यंत ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत विविध ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमुद आयसोलेशन सेंटरमध्ये दैनंदिन दाखल होणाऱ्या नागरिकांना तसेच अवेटेड,निगेटिव्ह, पॉझिटिव्ह पेशंटसाठी दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन सकाळी चहा, नाष्टा, दुपारचा चहा याची प्रती प्लेटची र.रु. ६०/- मे.अरहन्ती २४ एंटरप्रायझेस यांनी पुरविलेबाबत व त्यांना रक्कम अदा करणेस

**विषय क्र.५/९३**

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/२०४ दि.४/८/२०२० चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४०४,दि.११/८/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत उद्भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीमध्ये पुणे मनपा लागण झालेल्या रुग्णांना व संशयीत रुग्णांच्या विविध ठिकाणच्या क्वारंटाईन कक्षामध्ये तसेच प्रतिबंधित क्षेत्रामध्ये सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणेसाठी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यामधील अ.क्र. १ ते ४ या झालेल्या कामांची मे.आय सिक्युअर पॉवर टेक्नॉलॉजीस इंडिया प्रा.लि. यांनी र.रु. ३९,९०,३७३=२६ पर्यंत केलेल्या सी.सी.टि.व्ही. विषयक कामांची देयके अदा करणेस व त्यानुसार आवश्यकतेनुसार करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

**विषय क्र.६/९४**

संदर्भ - १)साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३/३/२०२०

२) महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२०

३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (क)

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र. ३/२१७ दि.१०/८/२०२० चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.४०६,दि.११/८/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे महानगरपालिका झोन क्र. ३ अंतर्गत वारजे-कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत स्थापित केलेल्या आयसोलेशन/CCC केंद्रामध्ये स्थापत्यविषयक दुरुस्ती कामे तसेच प्रतिबंध करण्यात येणा-या क्षेत्रामध्ये तसेच कोव्हिड -१९ या संसर्गजन्य आजारामुळे वाढणा-या नागरीकांची व्यवस्था करणे कामी गाद्या पुरविणे, पत्रा मांडव करणे, पत्रा पार्टीशन करणे व बांबूचे रेलिंग करणे आणि रेड झोन घोषित केलेला भाग सिल करणे कामी बांबूचे रेलिंग करणे, पत्रा लावणे इत्यादी काम करणे हे मोठया स्वरुपाचे व तातडीचे असल्याने सदर कामाच्या जाहिर निविदा न मागविता **मे.अनु कन्स्ट्रक्शन** या ठेकेदाराकडून दिनांक.०१.०५.२०२० पासून दि. ३१/७/२०२० पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (क) अन्वये करणेस मान्यता देण्यात आली असून खालील बाबीस मा. मुख्य सभा यांचे निदर्शनास आणणेत येत आहे.

1) वारजे-कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद आयसोलेशन सेन्टर्समध्येस्थापत्यविषयक दुरुस्ती कामे तसेच प्रतिबंध करण्यात येणा-या क्षेत्रामध्ये पत्रा मांडव करणे, पत्रा पार्टीशन करणे व बांबूचे रेलिंग करणे आणि रेड झोन घोषित केलेला भाग सिल करणे कामी बांबूचे रेलिंग करणे, पत्रा लावणे इत्यादी कामे करणे , मनपा मार्फत स्थापन करण्यात आलेल्या कोविड केअर सेंटर मध्ये गाद्या पुरविणे ही कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (क) नुसार मे.अनु कन्स्ट्रक्शन यांचेकडून मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये नमुद केलेल्या दरानुसार काम करुन घेणेस तसेच झालेल्या कामाचे दिनांक ०१/०५/२०२० पासून दि. ३१/७/२०२० पर्यंत र.रु. १८,३१,५५७=२४ पर्यंतचे बील खालील अर्थाशिर्षकामधून अदा करणेस.

अर्थाशिर्षक :- सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

कोव्हीड -१९ अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

**RE17F257**

2) मे.अनु कन्स्ट्रक्शन यांचेबरोबर करारनामा करणेस व प्रत्यक्ष होणा-या बिलाच्या 5% सुरक्षा ठेव (अनामत रक्कम) राखुन ठेवणेस.

**विषय क्र.७/९५**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२३२ दि.११/८/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४०७,दि.११/८/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे मैदान शिवाजीनगर येथे उभारण्यात येणा-या जंम्बो हॉस्पिटल/कोव्हीड हॉस्पिटलसाठी कमी अधिक प्रमाणात अंदाजे ५० कोटी रुपये तातडीने आगाऊ रक्कम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे यांना खालील अर्थशिर्षकामधून अदा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक सन २०२०-२१
RE 17F 257
COVID- 19 अंतर्गत अत्यावश्यक महसूली कामासाठी खर्च.

**विषय क्र.८/९६**

संदर्भ – १) मा.महेंद्र पठारे, मा.दिपक पोटे, मा.सुनिल कांबळे, आमदार, मा.सौ.नंदा लोणकर, मा.सौ.सुनिता गलांडे, मा.श्रीमती लता राजगुरु, मा.अशोक कांबळे, मा.राजेंद्र शिळीमकर, मा.सौ.वर्षा तापकीर, मा.सौ.मानसी देशपांडे, मा.प्रकाश ढोरे, मा.सौ.उज्ज्वला जंगले, मा.श्रीमती अमृता बाबर व मा.कु.हिमाली कांबळे यांचे दि.११/८/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४०८,दि.११/८/२०२०

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे शहरातील विकास कामांसाठी म.न.पा.च्या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेली आहे. कोविड-१९ च्या मुळे आर्थिक वर्ष सुरु झाल्यापासून विकास कामांची एस्टिमेट व टेंडर इ.प्रक्रिया मे.राज्य शासनाच्या आदेशानुसार होत नाही. त्यामुळे शहरातील विकास कामांना खीळ बसलेली आहे.
शहरातील विकास कामांची प्रक्रिया ही सुरु राहण्यासाठी मे.राज्य शासनास ही सभा पुणे शहरातील विकासकामांची प्रक्रिया सुरु करण्यासाठी विनंती करीत आहे.

तरी म.न.पा. प्रशासनाने मे.राज्य शासन व मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर विकास कामांची एस्टिमेट/टेंडर प्रक्रिया सुरु करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.९/९७**

संदर्भ – १) मा.मुख्य सभा ठराव क्र. २५७ दि. २४/८/२०१५
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घन.व्य./१४० दि.२५/६/२०२० चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.४३८,दि.१८/८/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी स्वच्छ सेवा सहकारी संस्था मर्यादित या संस्थे अंतर्गत कार्यरत कचरा वेचकांस कोविड आजाराच्या अनुषंगाने अतिरिक्त प्रोत्साहन भत्ता देणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) वस्ती पातळीवरील दारोदारी कचरा संकलन करणाऱ्या कचरा वेचकांस महानगरपालिकेमार्फत प्रत्येक घरामागे देण्यात येणारा प्रोत्साहन भत्ता हा १० रु. ऐवजी २० रुपये प्रती घर प्रति महिना याप्रमाणे सहा महिने कालावधीकरीता अदा करणेस

२) हा प्रोत्साहन भत्ता पुनर्वसन केलेल्या झोपडपट्ट्या (SRA) तसेच अघोषित झोपडपट्टी क्षेत्रासही लागू करणेस

३) वेळोवेळी आढावा घेऊन धोरणात बदल/आवश्यक ते बदल करण्याचा अधिकार महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस

४) स्वच्छ सहकारी संस्थेचे कामकाज समाधानकारक नसल्यास या संस्थेला पुणे महानगरपालिकेमार्फत देण्यात येणारी मदत तात्काळ थांबविण्यात येईल व पर्यायी व्यवस्था करण्यात येईल व याबाबतचा निर्णय घेण्याचा व पर्यायी व्यवस्था करणेचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस

**विषय क्र.१०/९८**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१८२ दि.२१/७/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४३९,दि.१८/८/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत उद्‌भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीमध्ये पुणे मनपा हद्दीत लागण झालेल्या रुग्णांच्या व संशयित रुग्णांच्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तकत्यामधील अ.क्र. १ ते १२ नुसार क्वारंटाईन कक्षामध्ये एकूण र.रुपये ५७,७५,८२२=९६ पर्यंत केलेल्या विद्युत विषयक कामांची देयके आदा करणेस व त्यानुसार आवश्यकतेनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

**विषय क्र.११/९९**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१८३ दि.२१/७/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४४०,दि.१८/८/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत उद्‌भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीमध्ये पुणे मनपा हद्दीत लागण झालेल्या रुग्णांच्या व संशयित रुग्णांच्या डॉ.नायडू हॉस्पीटल येथे करण्यात आलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तकत्यामधील अ.क्र. १ ते २ नुसार विद्युत विषयक कामांची एकूण र.रुपये २७,९६,९०२=६३ पर्यंत केलेल्या विद्युत विषयक कामांची देयके आदा करणेस व त्यानुसार आवश्यकतेनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

**विषय क्र.१२/१००**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/१४३,दि.२९/६/२०२० चे पत्र.
२) मा. सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
३) मा. सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
४) मा. सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
५) मा. सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
६) मा. सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
७) मा. सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
८) मा. सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
९) मा. सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
१०) मा. सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
११) मा. सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
१२) मा. सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
१३) मा.योगेश ससाणे, सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
१४) मा.योगेश ससाणे, सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
१५) मा.योगेश ससाणे, मा.गोपाळ चिंतल व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
१६) सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
१७) सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
१८) मा. सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
१९) मा.योगेश ससाणे, मा.गोपाळ चिंतल व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
२०) मा. सौ.सरस्वती शेंडगे,उपमहापौर व मा.अजय खेडेकर यांचे दि. ४/८/२०२० ची उपसूचना
२१) मा. नैमित्तिक ( वेतन आयोग ) समिती ठराव क्र.१, दि. ४/८/२०२०
२२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४४१,दि.१८/८/२०२०

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच नैमित्तिक ( वेतन आयोग ) समितीची शिफारस विचारात घेऊन तसेच स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन–

पुणे महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करणेसाठी खालीलप्रमाणे मे.महाराष्ट्र शासनास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१ ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेण्या सुधारित करताना विद्यमान संरचनेतील दि.१/१/१६ लगतपूर्वीच्या (वेतन बँडमधील वेतन + ग्रेड वेतन) X २.५७ या सूत्रान्वये नजिकच्या रुपयामध्ये पूर्णांकित करुन येणारी रक्कम सुधारित वेतन म्हणून निश्चित करणेस.

२ तदनंतर महानगरपालिकेतील सर्व संवर्गातील विविध पदांना शासनाकडील समकक्ष पदास असलेल्या ६ व्या वेतन आयोगाच्या ग्रेड पे नुसार निश्चित केलेल्या वेतन मॅट्रिक्समध्ये खालील उपसूचनांसह वेतन निश्चित करणेस

३ शासनाने आकृतीबंध मंजूर करण्यापूर्वीच म्हणजे दिनांक १/१/२००६ पासून ६ वा वेतन आयोगानुसार महापालिका अधिकारी व सेवकांच्या वेतनश्रेण्या सुधारीत करण्यात आलेल्या आहेत. ६ वा वेतन आयोग लागू केल्यापासून तब्बल ८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आकृतीबंध मंजुर करताना वेतनश्रेणी सुधारित करण्याची अट शासनाने नमूद केल्यामुळे या आकृतीबंधातील तरतुदीची पूर्वी भरती झालेल्या मनपा अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी पूर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणी न करणेस.

४ उपरोक्त अ.क्र. ३ विचारात घेता दि.१/१/२००६ वा दि.१/१/२०१० पासून प्रदान केलेल्या वेतनामधून कोणत्याही प्रकारची वसुली न करणेस .

५ मा. मुख्य सभा ठराव क्र. ३७२, दिनांक २३/१२/१९७७ आणि पुणे महानगरपालिका व पुणे महानगरपालिका कामगार युनियन (मान्यताप्राप्त) यांचेमध्ये दिनांक ९/३/१९७८ रोजी झालेल्या करारातील विहित तरतुदीनुसार केंद्र शासनाप्रमाणे महागाई भत्त्याचे देय दिनांक ग्राह्य धरुन कार्यवाही करणेस.

६ एलएसजीडी/एलजीएस वेतनवाढी या राज्य शासन नगर विकास व आरोग्य विभाग निर्णय क्र. टीआरएन १०७२/१८९४०/एन सचिवालय, मुंबई ३२ दिनांक १८/२/१९७५, नगर विकास विभाग विभाग शासन निर्णय क्र. जीईएन १००३/८८९/प्रक्र९८/२००३/ नवि १४, दिनांक ३/११/२००३ अन्वये प्रसृत करण्यात आलेल्या शासन निर्णयातील तरतुदी, मा. मुख्य सभा ठराव क्र. १४७, दिनांक २७/७/१९९९ अन्वये मान्य धोरणानुसार अनुज्ञेय जादा वेतनवाढीस मंजुरी देणेत आली असून, सदर मान्य धोरण पुढे चालू ठेवणेस.

७ फायनान्स परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सेवकांना अनुज्ञेय एक वेतनवाढ नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन १००३/८८९/प्रक्र९८/२००३/ नवि १४, दिनांक ३/११/२००३ अन्वये प्रसृत करण्यात आलेल्या शासन निर्णयातील तरतुदी, मा. स्थायी समिती ठराव क्र. १३०३, दिनांक ३१/१०/२००६ अन्वये मान्य धोरणानुसार अनुज्ञेय जादा वेतनवाढीस मंजुरी देणेत आली असून, सदर मान्य धोरण पुढे चालू ठेवणेस.

८ शासनाने ४ था व ५ वा वेतन आयोग मंजुर करताना घाणभत्ता अनुज्ञेय सफाई सेवकांना वेतन निश्चिती करताना एक जादा वेतनवाढ मंजुर केली आहे. इतर शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनेत सफाई सेवकांना घाणीमध्ये गटार स्वच्छतेचे, असुरक्षीत ठिकाणी काम करावे लागते. तसेच, ६ व्या वेतन आयोगामध्येही महापालिकेने या धोरणाची अंमलबजावणी केली असून, सदर सेवकांना एक जादा वेतनवाढ देण्याचे धोरण प्रस्तावित करण्यात येत असून, त्यास मंजुरी देणेस.

९ शासनाने ४ था व ५ वा वेतन आयोग मंजुर करताना सेवाकाल विचारात घेवून वेतनवाढ देण्याच्या धोरणास मंजुरी दिली असून त्यानुसार ६ व्या वेतन आयोगामध्येही महापालिकेने या धोरणाची अंमलबजावणी केली आहे. याच धर्तीवर ७ व्या वेतन आयोगामध्ये ४ ते १० वर्षे सेवाकालसाठी १ व १० वर्षे व त्यापेक्षा जादा सेवाकालासाठी २ वेतनवाढी प्रस्तावित केल्या असून त्यास मंजुरी मिळणेस.

१० शासन निर्णय, वित्त विभाग क्र. सेनिवे २०१९/प्रक्र. ५८/सेवा-४, दिनांक २३/१/२०१९, क्र. सेनिवे २०१९/प्रक्र. ५९/सेवा-४, दिनांक २४/१/२०१९, क्र. सेनिवे २०१९/प्रक्र. ५८/सेवा-४, दिनांक १/३/२०१९, क्र. सेनिवे २०१९/प्रक्र. ५८/सेवा-४, दिनांक ८/७/२०१९ व क्र. सेनिवे २०१९/प्रक्र. ५९/सेवा-४, दिनांक ३०/७/२०१९ अन्वये विहित करण्यात आलेल्या धोरणानुसार निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांचे सेवानिवृत्ती वेतन व अनुषंगिक लाभ प्रस्तावित करण्यात आले आहे.

११ मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रामध्ये नमूद सर्व बाबी, विषयपत्रासोबतची अनुसूची व नियमावलीस मान्यता देणेस.

**संदर्भ क्र.२ च्या उपसूचनेनुसार –**

१) दि.३१ डिसेंबर २०१५ अखेरपर्यंत पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शेड्युलमान्य जागी ज्या अधिकारी /कर्मचारी यांची नियुक्ती झाली आहे तसेच ज्या अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती

मिळाल्यानंतर त्यांचे वेतन ( ग्रेड पे ) कमी झालेला आहे अशा सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे ग्रेड वेतन पुणे मनपाच्या प्रचलित ६ व्या वेतन आयोगातील ग्रेड पे समकक्ष करून दि.१ जानेवारी २०१६ रोजी वेतन निश्चितीसहित ७ वा वेतन आयोग लागू करणेस

* मनपा प्रशासनाने अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचे पदनिहाय देण्यात येणाऱ्या भत्त्यांमध्ये दुपटीने वाढ करणेस
* ७ वा वेतन आयोगानुसार वेतन निश्चितीकरण झाल्यानंतर १/१/२०१६ ते ३१/३/२०२० या कालावधीतील फरकाची रक्कम सलग ३ समान हप्त्यांमध्ये देण्यात यावी.तसेच १/४/२०२० पासून ७ वा वेतन आयोग प्रत्यक्ष लागू होईपर्यंत होणारी फरकाची रक्कम ३ महिन्यात एकरकमी रोखीने देणेस
* महानगरपालिकेतील जे अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत त्यांना ७ व्या वेतन आयोगानुसार देय असलेल्या फरकाची रक्कम वेतन आयोग लागू झाल्यापासून सलगच्या दोन वर्षांमध्ये समान हप्त्यात देणेस.
* स्थानिक पूरक भत्ता व वाहतूक भत्ता हे दोन्ही मे.राज्य शासन वेळोवेळी जाहीर करेल त्यानुसार अदा करणेस.
* संगणक भत्त्यांमध्ये दुपटीने वाढ करणेस
* सह आयुक्त – हे पद उपआयुक्त या पदावर सलग १० वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर पदोन्नतीने भरण्यात येत असल्याने एस–२५ ऐवजी एस –२६ करणेस
* माहिती व जनसंपर्क अधिकारी – एस – १८ ऐवजी एस –२५ करणेस
* क्रीडा अधिकारी, कामगार कल्याण अधिकारी, प्रकल्प अधिकारी, सहा.उद्यान अधिक्षक, उपसंचालक प्राणिसंग्रहालय एस –१५ ऐवजी एस २१ करणेस
* सहाय्यक क्रीडा अधिकारी – एस –१४ ऐवजी एस –१७ करणेस
* विभागीय अग्निशमन अधिकारी – एस–१६ करणेस
* आरोग्य निरीक्षक – एस –१० ऐवजी एस – १३ करणेस
* वरिष्ठ आरोग्य निरीक्षक– एस –१५ करणेस
  उपआरोग्य निरीक्षक – एस–१६ करणेस
  मुख्य आरोग्य निरीक्षक – एस –१७ करणेस
* केमिस्ट – एस १३ ऐवजी एस–२१ करणेस
  असिस्टंट केमिस्ट – एस –१० ऐवजी एस १६ करणेस
* प्रशासन अधिकारी ( पूर्वीचे विभागप्रमुख ) – एस –१५ ऐवजी एस–२० करणेस
* अधिक्षक ( पूर्वीचे वरिष्ठ ) – एस – १४ ऐवजी एस – १६
* उपअधिक्षक ( पूर्वीचे सर लेखनिक / कार्यालय अधीक्षक ) – एस –१३ ऐवजी एस–१५ करणेस
* वरिष्ठ लिपिक – एस –१० ऐवजी एस–१२ करणेस
* सहाय्यक अतिक्रमण अतिक्रमण – एस – १० ऐवजी एस–१२ करणेस
  अतिक्रमण निरीक्षक एस –१३ करणेस
  वरिष्ठ अतिक्रमण निरीक्षक एस – १४ करणेस
  प्रमूख अतिक्रमण निरीक्षक एस–१६ करणेस
* मेंटेनन्स सर्व्हेअर एस – १३ ऐवजी एस – १४ करणेस
  हेड मेंटेनन्स सर्व्हेअर एस –१४ ऐवजी –१५ करणेस
* ऑक्झीलरी नर्स – एस –८ ऐवजी एस –१३ करणेस
* मोटार वाहन विभाग ॲटो इलेक्ट्रिशियन – एस – ६ करणेस
* प्रमुख वाहन चालक /हेड ड्रायव्हर – एस – १३ करणेस
* कार्यदेशक – एस – १४ ऐवजी एस –१५ करणेस
* अधिक्षक वाहतूक – एस १४ ऐवजी एस –१६ करणेस
* वाहन निरीक्षक – एस –१४ ऐवजी एस–१५ करणेस
* डेपो सुपरवायझर – एस –१४ करणेस
* नर्सिंग ऑर्डीली – पद वर्ग ४ मधून ३ करणेस ( सेवा प्रवेश नियमावलीशी संबंधित )
* ग्रेड पे वेतन तफावत दूर करावी.४४००–७२२० ग्रेड पे १६५० मागणी ५२००–२०२०० ग्रेड पे २३०० करणेस पदोन्नती ५० टक्के खाते अंतर्गत ,१२ वर्षे नंतर बढती ५० टक्के खाते अंतर्गत ( सेवा प्रवेश

नियमावलीशी संबंधित ) सायकल भत्ता २५० ऐवजी पेट्रोल भत्ता २००० करणेस

* सुरक्षारक्षक – एस – १ ऐवजी एस –२ करणेस
* मोकादम – वर्ग ४ मध्ये दर्शविणेस
* फायरमन – वर्ग ४ मध्ये दर्शविणेस
* आरोग्य / घनकचरा विभाग – घाण भत्ता असलेल्या कर्मचाऱ्यांना पिंपरी चिंचवड मनपाप्रमाणे १० टक्के केअर अलाउन्स मिळणेस.
* मुद्रणालय विभाग – मुद्रणालय विभागातील पदांना शासनाचा समकक्ष पदांचा पे मॅट्रीक्स देणेस
* आरोग्य विभाग – सांसर्गिक रूग्णालयात काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकारी, नर्स व इतर मेडिकल स्टाफला धोका भत्ता देणेस.
* कीटक प्रतिबंधक विभाग – सायकलभत्ता २५० ऐवजी पेट्रोल भत्ता २००० करणेस.
* ६५४ शासन मान्य पदे, २०१८ नंतर घाणभत्ता वारस व अनुकंपा नियुक्ती – ग्रेड पे मधील तफावत दूर करून महानगरपालिका मधील इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे समकक्ष ग्रेड पे करणेस.
* बायोकेमिस्ट – एस–१५ वेतनश्रेणी दिली आहे ६९०००–१८८३०० मध्ये समाविष्ट करणेस

**संदर्भ क्र.३ च्या उपसूचनेनुसार –**

सुरक्षारक्षक– १) डयुटी अलौंस – प्रति दिन रूपये २०/– मिळावे. २) धुलाईभत्ता – मासिक रूपये ५००/– रूपये मिळावे ३) वाहतूक भत्ता – मासिक रूपये १०००/– मिळावे ४) अंगरक्षक – मासिक रूपये २७००/– मिळावे. ५) गणवेश – किमान १०,०००/– दर दोन वर्षांनी महागाई व बाजारभावाचे मुल्य विचारात घेता गणवेश रकमेमध्ये १०% वाढ करण्यात यावेत. ६) नैमित्तिक रजा – नैमित्तिक रजेचा अतिरिक्त १५ दिवसाचा दोन पटीने मोबदला वार्षिक़ बहाल करणेस

**संदर्भ क्र.४च्या उपसूचनेनुसार –**

कनिष्ठ अभियंता – सन २००७ मध्ये नियुक्त करण्यात आलेल्या अभियंत्याना नेमणुकीपासून पूर्वलक्षी प्रभावाने पुणे मनपाच्या वेतन श्रेणीप्रमाणे वेतन निश्चितीकरण करणेस आणि त्याप्रमाणे दि. १/१/२०१६ पासून ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी नुसार वेतन निश्चित करण्यात यावे. तसेच दि.१/१/२००६ ते दि. ३१/१२/२०१५ अखेरच्या फरकाची रक्कम समान दोन हप्त्यात देणेस

**संदर्भ क्र.५च्या उपसूचनेनुसार –**

मा.नगरसचिव कार्यालयातील ज्येष्ठ समिती लेखनिक – एस १२ ऐवजी एस–१३ करणेस

**संदर्भ क्र.६च्या उपसूचनेनुसार –**

१)पुणे महापालिका अधिकारी / सेवकांना सेवानिवृत्तीचे अनुज्ञेय लाभ मंजुर करत असताना उपदान रकमेची कमाल मर्यादा केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे करणेस.

२)महापालिका अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त /दिवंगत झाल्यानंतर त्यांच्या खाली असलेल्या कमाल ३६५ दिवसांच्या अर्जित रजेचे रोखीकरण करून त्यास अदा करणेस

**संदर्भ क्र.७च्या उपसूचनेनुसार –**

माहिती व तंत्रज्ञान – माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील संगणक ऑपरेटर (एस – १४) पदाचे नाव बदलून सदर पदाचे नाव संगणक तंत्रज्ञ (प्रोग्रामर ) (एस–१४) असे करावे, अथवा सदर संगणक ऑपरेटर (एस–१४) हे पद संगणक तंत्रज्ञ (प्रोग्रामर ) (एस–१४ या पदामध्ये विलिन करण्यात यावे. जेणेकरून दोन्ही वेगवेगळया पदाच्या समान नावांमुळे संभ्रम निर्माण होणार नाही तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाकडील पदांमध्ये देखील सुसूत्रता येईल तसेच या पदास वाहन भत्ता मंजूर करणेस

**संदर्भ क्र.८च्या उपसूचनेनुसार –**

१)सहाय्यक व्यवस्थापक – ३८६००–१२२८००(४६००) करणेस (मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय विभाग (१५१/७)
२)कंपोझ फोरमन – ९३००–३४८००(४२००) करणेस (मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय विभाग (१५२/५४)
३)मशिन फोरमन – ९३००–३४८००(४२००) करणेस (मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय विभाग (१५२/५६)
४)बांधणी फोरमन ९३००–३४८००(४२००) करणेस (मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय विभाग (१५२/५८)
५) सिक्युरिटी फोरमन ९३००–३४८००(४२००) करणेस (मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय विभाग (१५२/५८)
६) डी.टी.पी. फोरमन –९३००–३४८००(४२००) करणेस (मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय विभाग (१५२/५८)
७)वेब ऑफसेट मशीनमन – ५२००–२०२००(२८००) करणेस (मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय विभाग (१५३/६९)
८) प्लेटमेकर कम कॅमेरा ऑपरेटर –५२००–२०२००(२८००) करणेस (मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय विभाग (१५३/६९)
९)बाईडर –५२००–२०२००(२४००) करणेस (मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय विभाग (१५४/७९)
१०) नंबर चेकर – ५२००–२०२००(२४००) करणेस (मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय विभाग (१५४/७९)
११)ज्यु.बाईडर –५२००–२०२००(१९००) करणेस (मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय विभाग (१५४/९०)
१२)यंत्र परिचर – ५२००–२०२००(२४००) करणेस (मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय विभाग (१५४/७९)
१३)टेक्निकल हेल्पर –५२००–२०२००(१९००) करणेस (मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय विभाग

**संदर्भ क्र.९च्या उपसूचनेनुसार –**

आरोग्य प्रयोग शाळेतील कनिष्ठ व वरिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना ९३००–३४८०० हा पे बॅण्ड व ग्रेड पे ५४००/– (पीबी–३) हे ६ व्या वेतन आयोगात समजण्यात यावे व त्या अनुषंगाने कार्यवाही करावे तसेच सातव्या वेतन आयोगात सुधारित वेतन मॅट्रीक्स वेतन स्थर (एस–१६ ४४९००–१४२४००) हयाप्रमाणे आम्हांला ७ व्या वेतन आयोगात देण्यात यावे.

**संदर्भ क्र.१०च्या उपसूचनेनुसार –**

उप मुख्यलेखापरिक्षक या हुद्दयाचा पे बॅण्ड १५६००– ३९१०० ग्रेड पे ८१०० ही दुरूस्ती करण्यात यावे.

**संदर्भ क्र.११च्या उपसूचनेनुसार –**

बिगारी या हुद्याची नेमणूक २००९ पासून झालेल्या सेवकांची सहाव्या वेतन आयोगामध्ये बिगारी या हुद्यावर ४४४०–७४४०+२३०० ग्रेड पे ने फिक्सेशन करून सातव्या वेतन आयोगात पुणे मनपाच्या वेतन श्रेणी नुसार वेतन देणेस

**संदर्भ क्र.१२ च्या उपसूचनेनुसार –**

वास्तुशास्त्रीय आरेखक, यांची वेतन श्रेणी ९३००–३४८०० ग्रेड पे ४८००,चार वर्षानंतर ५२००/– ग्रेड पे आरेखक (स्थापत्य) यांची वेतनश्रेणी ५२००–२०२०० ग्रेड पे ४१५०, चार वर्षानंतर ९३००–३४८०० ग्रेड पे ५२०० व अनुरेखक ५२००–२०२०० ग्रेड पे ३१००, चार वर्षानंतर ५२००–२०२०० ग्रेड पे ३९०० देण्यात यावे तरी सदर पदांना शासनाप्रमाणे सातव्या वेतन आयोगात पे स्केल देणार असतील बढतीची पदे १२ व २४ वर्षानंतर पुढील स्केलमध्ये समावेश होणे आवश्यक आहे. पुणे मनपाने मान्यतेसाठी ठेवलेल्या नियोजित प्रस्तावामध्ये आरेखक साठी एस १०, एस १४ व अनुरेखक साठी एस–७, एस–८ ही वेतनश्रेणी निश्चित केली आहे त्या ऐवजी आरेखक साठी सध्याचा ग्रेड पे ४१५०/–आहे यांना एस–१३ मध्ये , सध्याचा ग्रेड पे ५२००/– आहे यांना एस–१८ व अनुरेखकसाठी सध्याचा ग्रेड पे ३१०० /– आहे यांना एस–११. सध्याचा ग्रेड पे ३९०० एस–१३ मध्ये समावेश करण्यात यावा, तसेच आरेखक व अनुरेखक यांची सात वर्षाची अट रद्द करणेस

**संदर्भ क्र.१३च्या उपसूचनेनुसार –**

वाहन चालक प्रमुख ( मुख्य वाहन चालक ) एस –१३ (३५४००–११२४०० ) करणेस

**संदर्भ क्र.१४च्या उपसूचनेनुसार –**

मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे मेंटेनस सर्व्हेअर हे पदनाम पुढील प्रमाणे कायम ठेवून ७ व्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणी मध्ये मेंटेनस सर्व्हेअर या पदास एस–१५ ४१८००–१३२३००(४८००) ही वेतनश्रेणी व मुख्य मेंटनेस सर्व्हेअर या पदास एस–१६ ४४९००–१४२४००(५२०० ग्रेड पे ) प्रमाणे वेतन श्रेणी निश्चित करावी.

**संदर्भ क्र.१५ च्या उपसूचनेनुसार –**

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनात दि २१ डिसेंबर २०१५ अखेर पर्यत जे सेवक अधिकारी यांना नव्याने नियुक्त व तसेच जे सेवक/अधिकारी यांना प्रचलित असलेल्या (६ व्या वेतन आयोगात शासनाने मान्य केलेला ग्रेड पे) ग्रेड पे कमी करून नेमणूका वा पदोन्नती दिलेल्या आहेत अशा सर्व सेवक /अधिकारी यांचे ग्रेड वेतन पुणे महानगरपालिकेच्या ६ व्या वेतन आयोगातील वेतन श्रेणीशी समकक्ष करून दि १ जानेवारी २०१६ रोजी वेतन निश्चिती सहित ७ वा वेतन आयोग लागू करावा किंबहूना तसे ७ व्या वेतन आयोगात वेतन निश्चित करावे.

**संदर्भ क्र.१६च्या उपसूचनेनुसार –**

पुणे महानगरपालिका नगरसचिव कार्यालयाकडील लिपिक टंकलेखक (ज्युनिअर ग्रेड लेखनिक ) हे पदे सातवा वेतन आयोग एस–१० पे – मॅट्रीक्स मध्ये समाविष्ठ करण्यात यावे.

**संदर्भ क्र.१७च्या उपसूचनेनुसार –**

पुणे महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करणेसाठी मा.वेतन आयोग(नैमित्तिक ) समितीमध्ये आलेल्या उप–सूचना तांत्रिक बाबींमध्ये विसंगत असल्यास दुरूस्त करण्याचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष,वेतन आयोग ( नैमित्तिक ) सातवा वेतन आयोग यांना राहतील.

**संदर्भ क्र.१८ च्या उपसूचनेनुसार –**

सन २००७ मध्ये नियुक्त सर्व कनिष्ठ अभियंता ( स्थापत्य) यांना नेमणुकीपासून पूर्वलक्षी प्रभावाने पदविकाधारक व पदवीधारक यांना पुणे मनपाच्या वेतन श्रेणी प्रमाणे वेतन निश्चितीकरण करणेस आणि त्याप्रमाणे दि.१/१/२०१६ पासून ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी नुसार वेतन निश्चित करण्यात यावे. तसेच दि. १/१/२००६ ते दि. ३१/१२/२०१५ अखेरच्या फरकाची रक्कम समान हप्त्यात देण्यात यावी.

**संदर्भ क्र.१९ च्या उपसूचनेनुसार –**

महाराष्ट्र शासन क्र.पी.एम.सी./३००२/२२/१०७प्र.क्र.२२५/नवि.२२ मंत्रालय मुंबई दि.२९/७/२००६ नुसार शासन नवनिर्मित जागांवर दि.३१ डिसेंबर २०१५ अखेर ग्रेड पे कमी करून ज्या सेवक / अधिकारी यांची नियुक्ती व पदोन्नती दिली आहे अशा सेवक / अधिकारी यांना पदोन्नती / नियुक्ती दिनांकापासून ते दि.१ जानेवारी २०१६

अखेर पर्यंत पुणे महानगरपालिकेच्या ६ व्या वेतन आयोगातील ग्रेड पे हा पूर्ण लक्षी प्रभावाने लागू करावा व त्याची थकबाकी देण्यात यावी.

**संदर्भ क्र.२० च्या उपसूचनेनुसार –**

ऑटो इलेक्ट्रिक यांना पुढील बढती करीता पद नसल्याने फिटर व त्या पुढील पदांवरील तफावत दूर करणेबाबत.

**<u>विषय क्र.१३/१०१</u>**

संदर्भ – १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/एचओ/२३६ दि.१८/८/२०२० चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४४२,दि.१८/८/२०२०

----

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

बालेवाडी स.नं.२०,२१ व बाणेर स.नं.१०९ येथील इमारतीमध्ये पंचशील फांउडेशन यांचेकडून उभारण्यात येणा–या कोव्हिड केअर हॉस्पिटल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये भाकरे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल यांचे दरपत्रक दोघात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून कोविड–१९ आजाराचा प्रादुर्भाव असेपर्यंत चालविण्यास देणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१.बालेवाडी स.नं.२०,२१ व बाणेर स.नं.१०९ येथील इमारतीमध्ये पंचशील फांउडेशन यांचेकडून उभारण्यात येणा–या कोव्हिड केअर हॉस्पिटल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये भाकरे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल यांना कोविड–१९ आजाराचा प्रादुर्भाव असेपर्यंत पहिल्या टप्यात भाकरे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल यांनी दिलेल्या न्युनतम दराप्रमाणे १०० बेडस चालविण्यास देणेस व आवश्यकतेनुसार बेडस्च्या संख्येत वाढ करणेस

२.वरील कामी येणारा खर्च आरोग्य खात्याकडील अर्थशिर्षक सन २०२०–२१ ‘‘अंतर्गत अत्यावश्यक महसूली खर्च कामासाठी खर्च RE17 F 257 COVID – 19" या अर्थशिर्षकमधुन करणेस

नगरसचिव
पुणे महानगरपालिका.